महाराष्ट्र शासनमान्य जाहिरात यादीवरील समाविष्ट वृत्तपत्र

# संविधान कलम

संपादक : प्रियांका शशिकांत कांबळे


■ RNI No. : MAHMAR/2017/74488

■ DECL NO/: SDM/Dt/Sr/PUNE/07/2025/ Dt.02/05/2025

■ वर्षे ९ ■ अंक १९ ■ साप्ताहिक ■ पुणे, मंगळवार, दि. ३० डिसेंबर ते ५ जानेवारी २०२६ ■ मुल्य : ३ रु ■ पान ४

Plush

Beauty Salon & Spa



Only for Ledies

Shop No.7, Mauli Krupa Complex, S.No.B6/28/1+2, Azadnagar, Kothrud, Pune- 411035

Mobile - 9359376293

# युती-आघाडीचा 'घोळात घोळ'!

■ **जागा वाटपाच्या तिढ्याचा परिणाम सोलापूर, अमरावतीत युती तुटली**

**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकेसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ३० डिसेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत आहे. त्यातच आता उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ ४८ तासांचा अवधी शिल्लक राहिला आहे. मात्र, राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून घोडे अडलेलच आहे. महायुतीमध्ये भाजप व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची बोलणी सुरु आहे. तर दुसरीकडे अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस वेगळी निवडणूक लढवत आहे. तर महाविकास आघाडीत काँग्रेस, ठाकरे सेना, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अद्यापही एकमत न झाल्याने कुठे महायुतीत तर कुठे महाविकास आघाडीत फाटाफूट झाल्याचे पाहावयास मिळाले आहे.

सध्या तरी मुंबई महापालिकेत भाजप, शिवसेनेचे जवळपास ठरले आहे. काही जागांवर अद्याप बोलणी सुरु आहे. तर पुणे, ठाणे आणि वसई-विरारमध्ये दोन्ही पक्षांची बोलणी अंतिम टप्प्यात आली आहे. तर नाशिक, छत्रपती संभाजीनगर, मीरा भाईंदरमध्ये चर्चा थांबली आहे तर अमरावती, सोलापूरमध्ये महायुती फिस्कटली आहे. तर काही महापालिकेत अजूनही चर्चेचे गु-हाळ सुरूच आहे.

सोलापूर महापालिकेत दोन्ही पक्षामधील महायुती तुटली आहे. त्याठिकाणी एकनाथ शिंदेंची शिवसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली असल्याची घोषणा माजी मंत्री व शिवसेनेचे नेते सिद्धाराम म्हेत्रे यांनी केली आहे. दोघांनाही ४५-४५ सामान जागा वाटून घेतल्या आहेत. तर अमरावतीत भाजप ४५ ते ५० जागांवर लढण्याच्या तयारीत असताना, शिंदे गट आणि राणांच्या 'युवा स्वाभिमान' पक्षाला किती जागा द्यायच्या, यावरून महायुती फिस्कटली आहे.

मुंबई महापालिका निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाने ठाकरे बंधुंबरोबर युती केली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला उबाठा मनसे यूतीकडून १० जागा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा ५२ जागांच्या मागणीचा प्रवास अखेर १० जागांवर येऊन संपला आहे. यामुळे आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत ठाकरे बंधूबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष देखील सहभागी असणार आहे.

पुण्यात महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून जागावाटपासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून या बैठकीकडे पाठ फिरवण्यात आली आहे. त्यामुळे ठाकरे गट आणि काँग्रेसच्या नेत्यांमध्ये बैठक पार पडली. यावेळी या नेत्यांनी शरद पवारांची राष्ट्रवादी चर्चेसाठी न आल्याची तक्रार वरिष्ठांकडे केली. यावर संजय राऊत यांनी कोणाची वाट पाहू नका पुढे जा अशी सूचना केल्याची माहिती समोर आली आहे.

आज सकाळपासून आम्ही निवडणुकीच्या बैठकीसाठी बसलो आहोत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना देखील निरोप दिले होते. ते दुपारी येणार होते पण अजून त्यांचे नेते आले नाहीत. तरीही काल ज्या जागा त्यांना ठेवल्या आहेत त्या आजही तशाच आहेत. १६५ जागांची आमची यादी तयार आहे. मी त्यांच्या सगळ्या नेत्यांना कॉल केला त्यांचे नेते फोन उचलत नाही आहे. कुणी आलं कुणी नाही आलं तरी आमची तयारी आहे. काँग्रेस आणि ठाकरे गट पुण्यात ताकदीने लढू.

## अखेर मावळ गौण खनिज प्रकरणातील तहसीलदारांचे निलंबन मागे

**पुणे :** मावळ तालुक्यातील गौण खनिज प्रकरणात निलंबित करण्यात आलेल्या १० अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निलंबन अखेर राज्य सरकारने मागे घेतले आहे. या निलंबनाविरोधात पुणे विभागातील सर्वच महसूल कर्मचाऱ्यांनी चार दिवस काम बंद आंदोलन केले होते. यानंतर राज्य सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला होता. अधिकारी व कर्मचाऱ्यांची चूक नसताना हे निलंबन करण्यात आल्याचा दावा राज्य अधिकारी व कर्मचारी महासंघाने केला होता. अखेर राज्य सरकारने निलंबन मागे घेत असल्याचे आदेश जारी केले आहेत. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मावळ तालुक्यातील गौण खनिज प्रकरणात राज्य सरकारने चार तहसीलदार चार मंडळ अधिकारी व दोन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना निलंबित केले होते. मावळचे आमदार सुनील शेळके यांनी हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात लक्षवेधी सूचना दाखल केली होती. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणात या दहा अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची घोषणा विधानसभेत केली होती. त्यानंतर जिल्ह्यातील महसूल विभागात मोठी खळबळ उडाली. अधिकाऱ्यांना विश्वासात न घेता त्यांच्यावर अन्यायकारक पद्धतीने कारवाई करण्यात आली असून याचा निषेध म्हणून जिल्ह्यातील सर्व महसूल कर्मचारी अधिकाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले होते.

## सतिश काळे यांचा क्रांतिरत्न पुरस्काराने गौरव

देहुरोड बुद्धविहार कृती समिती व धम्मभूमी फेस्टिव्हल यांच्या संयुक्त विद्यमाने.

संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतिश काळे यांना सामाजिक, वैचारिक व बहुजनहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'क्रांतिरत्न पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. देहूरोड येथील ऐतिहासिक धम्मभूमीच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला. बुद्धविहार कृती समिती व धम्मभूमी फेस्टिव्हल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



या सोहळ्याचे संयोजक टेक्सास गायकवाड होते. अष्टप्रधान मंडळ, बुद्धविहार कृती समिती, धम्मभूमी सुरक्षा समिती, धम्मभूमी एज्युकेशन सोसायटी, धम्मभूमी महिला महासंघ व ज्येष्ठ उपासक संघ यांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडला. पुरस्कार प्रदान करताना आयोजकांनी नमूद केले की, क्रांतिकारी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सतिश काळे यांनी निधड्या छातीने ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध लढा देत बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. मराठा व बहुजन बांधवांना आरक्षण मिळवून देण्यासाठी केलेली त्यांची कामगिरी अविस्मरणीय आहे. ऐतिहासिक धम्मभूमीवर मिळालेल्या या सन्मानामुळे सामाजिक कार्यकर्ते, कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त होत असून सतिश काळे यांच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## राज्यात सुमारे दिड लाख मुले कुपोषित

**मुंबई :** राज्यातील कुपोषणाच्या समस्येचे निवारण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत आणि गेल्या तीन वर्षांत कुपोषित मुलांची संख्या कमी झाली आहे. असे असले तरी राज्यात अद्यापही १ लाख ३७ हजार ४०७ मुले कुपोषणग्रस्त असल्याची कबुली खुद्द राज्य सरकारने नुकतीच उच्च न्यायालयात दिल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

सरकारच्या महिला व बाल विकास विभागाने प्रतिज्ञापत्राद्वारे ही कबुली दिली. विभागाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, कुपोषणाच्या निर्देशकांमध्ये सुधारणा झाली असून मध्यम तीव्र कुपोषण (मॅम) २०२३-२४ मध्ये ४.२१ टक्के होते. ही टक्केवारी २०२५-२६ मध्ये ३.४३ टक्क्यांपर्यंत कमी झाली. तर याच कालावधीत गंभीर तीव्र कुपोषण (सॅम) १.४४ टक्क्यांवरून ०.७ टक्क्यांपर्यंत घटल्याचा दावा केला.

पोषण ट्रॅकरच्या आकडेवारीनुसार, मार्च २०२३ मध्ये सॅम मुलांची संख्या ८० हजार २४८ होती, ती नोव्हेंबर २०२५ मध्ये १८ हजार ३९० पर्यंत कमी झाली, तर याच कालावधीत मॅम मुलांची संख्या २ लाख १२ हजार २०३ वरून १ लाख १९ हजार ०१७ पर्यंत कमी झाली. तथापि, या घसरणीनंतरही, राज्यात १ लाख ३७ हजार ४०७ मुले अद्याप कुपोषणग्रस्त असल्याचे ताज्या आकडेवारीवरून निदर्शनास आल्याचे विभागाने म्हटले. पोषण ट्रॅकर हे एक डिजिटल देखरेख उपकरण असून अंगणवाडी केंद्रे, कर्मचारी आणि गर्भवती महिला, स्तनदा माता व मुलांसह लाभार्थ्यांचा मागोवा घेण्यासाठी वापरले जाते.

तसेच, कुपोषण वाढीचे निरीक्षण आणि पूरक पोषण माहितीद्वारे पोषण वितरणात सुधारणा करता येईल. दुसरीकडे, वित्त विभागाने आपल्या प्रतिज्ञापत्रात, प्रशिक्षित आरोग्य सेवा व्यावसायिकांची उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने विविध जिल्ह्यांमध्ये नऊ नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास मान्यता दिल्याचा, तसेच वैद्यकीय शिक्षण आणि औषध विभागामार्फत पुरेसा निधी वाटप करण्यात आल्याचा दावा केला आहे. राज्यातील दरडोई आरोग्य सेवा खर्च २०२१-२२ मध्ये १,८७५ रुपये होता. तो २०२४-२५ मध्ये २,६५९ रुपयांपर्यंत वाढवण्यात आला. त्याचप्रमाणे, आरोग्य क्षेत्रासाठी निधीचे वाटप विभागीय गरजांनुसार केले जात असल्याचेही म्हटले आहे.

गेल्या अडीच वर्षांत राज्यात पाच वर्षांखालील ३२ हजार २२६ मुलांचा आणि २,८६१ मातांचा मृत्यू झाल्याचे नमूद करणा-या वृत्तपत्राची उच्च न्यायालयाने दखल घेऊन सरकारच्या संबंधित विभागांना नोटीस बजावली होती व त्यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. कुपोषण हे या मृत्युंमागील एक प्रमुख कारण असल्याचे वृत्तात म्हटले होते.


न्यायालयानेही सरकारच्या संबंधित विभागांना नोटीस बजावताना, आरोग्य सेवा पायाभूत सुविधा आणि प्रत्यक्ष गरजा यांच्यात, विशेषत: बाल कुपोषणाचा सामना करण्यासाठी असलेल्या प्रणालींमध्ये मोठी तफावत असल्याचे नमूद केले होते. तसेच, न्यायालयाला सहकार्य करण्यासाठी वकील अखिलेश दुबे यांची न्यायमित्र म्हणून नियुक्ती केली होती व त्यांना या प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्यास सांगितले होते. न्यायालयाने या समस्येच्या निवारणाची प्रमुख जबाबदारी असलेल्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाला उत्तर दाखल करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली.

सरकारने नोंदवलेल्या कुपोषणाच्या मृत्यूंचा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्याची विनंती न्यायमित्र दुबे यांनी न्यायालयाकडे केली. त्यावर, अशी माहिती अनेकदा दडपली जात असल्याचा टोला न्यायालयाने लगावला. तथापि, या प्रकरणी कोणताही तपशील लपवला जाणार नाही आणि पुढील सुनावणीच्या वेळी तो सादर केला जाईल असे आश्वासन अतिरिक्त सरकारी वकील ओमकार चांदूरकर यांनी न्यायालयाला दिले.

## समृद्धी महामार्गावर राज्यमंत्री जाधव यांच्या कारला भीषण अपघात, तिघे गंभीर

**वाशिम :** केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कारला भीषण अपघात झाला. समृद्धी महामार्गावर वाशिम जिल्ह्यातील मालेगावनजीक ही घटना घडली. कारने ट्रकला जोरदार धडक दिली. हा अपघात झाला तेव्हा मंत्री कारमध्ये नव्हते त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. या अपघातामध्ये तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिस या अपघाताचा तपास करत आहेत.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना नागपूर विमानतळावर सोडल्यानंतर त्याचे अंगरक्षक, सहकारी आणि कारचालक हे मेहकरच्या दिशेने जात होते. याचदरम्यान मध्यरात्री समृद्धी महामार्गावर त्याच्या कारला भयंकर अपघात झाला. कारने ट्रकला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये कारचा चक्काचूर झाला. अपघातामध्ये प्रतापराव जाधव यांचे अंगरक्षक, त्यांचे सहकारी आणि कारचालक हे तिघे जण गंभीर जखमी झाले.



अपघातामध्ये गंभीर जखमी झालेल्या तिघांना पोलिसांनी तात्काळ वाशिम येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू असून तिघांचीही प्रकृती चिंताजनक आहे. मंत्री प्रतापराव जाधव यांना अपघाताची माहिती मिळताच त्यांनी दिल्ली दौरा रद्द केला. ते मुंबईवरून मेहेकरला परत आले. त्यांनी जखमींची भेट घेत त्यांच्या प्रकृतीबाबत विचारपूस केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात समृद्धी महामार्गावर माळेगावजवळ झाला. मंत्री प्रतापराव जाधव यांची कार नागपुरवरून मेहेकरच्या दिशेने जात होती. तर मुंबईवरून एक मिनी ट्रक नागपुरकडे जात होता. या ट्रकने महामार्गावर अचानक युटर्न घेतला त्यामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि या कारने थेट ट्रकला जोरदार धडक दिली.

संविधान कलम

■ वर्ष ९ वे ■ अंक १९ ■ पुणे, मंगळवार, दि. ३० डिसेंबर ते ५ जानेवारी २०२६



# संपादकीय

## स्त्री मुक्ती आणि शिक्षण

स्त्रीसत्ताक कालखंडाच्या पतनानंतर आजतागायत स्त्री मुक्तीचा प्रश्न अनुत्तरित आहे. सापेक्ष समतावादी समाजाची प्रेरणा घेऊन तो पुढे विकसित होणे गरजेचे होते. परंतु तसे न होता विषमताधिष्ठित पुरुषसत्ताक वर्ण व्यवस्था अस्तित्वात आली.

स्त्रियांच्या दुय्यमत्वतेचा व गुलामगिरीचा प्रश्न स्वरूप बदलून कार्यरत आहे. स्त्रियांची गुलामगिरी संस्कृतीचा भाग बनली. तीच आदर्श नीतिमत्ता, मूल्य बनल्यामुळे समाजाचा जगण्याचा भाग बनली. कालबाह्य नीतिमूल्ये, संस्कृती, विवेकशून्यरीत्या कुटुंबाचा भाग बनते तेव्हा तिच्या विरोधातला संघर्ष जिकिरीचा बनतो. स्त्री गुलामगिरीच्या बेड्या भारतात कुटुंब रचनेने जखडून ठेवल्या आहेत. भारतातील कुटुंब रचनेचा आधार जातीसंस्था असल्यामुळे स्त्रियांची गुलामगिरी घट्ट झाली. स्त्रियांवर बंधने लादून जातीव्यवस्थेचे सातत्य टिकवले गेले. स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न भारतापुरता मर्यादित नाही. जगभर त्या-त्या व्यवस्थेत स्त्रियांचा प्रश्न आवासून उभा आहे, हे नुकतेच प्रसिद्ध झालेल्या जागतिक विषमता अहवाल २०२५ ने पुढे आणले आहे. स्त्रियांची मिळकत, संपत्ती व शिक्षण यातील विषमता या अहवालात स्पष्ट केली आहे.

जागतिक विषमता अहवाल २०२५ ने भारतात टोकाची विषमता असल्याचे निदर्शनास आणले आहे. भारतातील १० टक्के लोकांकडे ५८ टक्के आणि खालच्या ५० टक्के लोकांकडे केवळ १५ टक्के मिळकत आहे. सर्वात वरच्या १ टक्के लोकांकडे ४० टक्के संपत्ती एकवटली आहे. सर्वाधिक विषमता असलेल्या देशात भारताची गणना होते. युरोपीय (भांडवली देश) देशाच्या तुलनेत वंश, जात, वर्ग अशा बहुपदरी व्यवस्था असलेल्या देशात विषमतेचे प्रमाण जास्त व दरी टोकाची आहे. विषमतेची सर्वाधिक दरी व प्रमाण स्त्रियांचे आहे. विविध देशातील स्त्रियांच्या शोषणाचे प्रमाण भिन्न आहे. भारत व भारतासारख्या समकक्ष देशात स्त्रियांची आर्थिक विषमता विदारक आहे. विषमता अहवालाप्रमाणे या देशातील पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे उत्पन्न केवळ २० टक्के आहे. १९९० ते २०२५ या ३५ वर्षांच्या काळात या स्त्रियांच्या मिळकतीत ०.४ टक्के वाढ झाली आहे. यातून स्त्रियांचे टोकाचे आर्थिक शोषण व त्याचे सातत्य स्पष्ट होते. विषमतेची कारणमीमांसा अहवालात पुढीलप्रमाणे केली आहे. गरोदर व बालसंगोपन, कौटुंबिक रचना, संस्कृती, साधनांचा अभाव, शिक्षणाचा अभाव इत्यादी प्रमुख कारणांमुळे स्त्रियांना दुय्यमत्व प्राप्त होते, असे हा अहवाल म्हणतो. भारतात स्त्रियांची गुलामी तिहेरी व जाती श्रेणीबद्ध असल्याचे शरद पाटील सांगतात.

युरोपमध्ये माध्यमिक शिक्षणातील लिंगअभावी फरक नाहीच्या बरोबर आहे. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण युरोपमध्ये ९८ टक्के आहे. परंतु भारतासारख्या देशात प्राथमिक शिक्षणापासूनच लिंगअभावी फरक दिसून येतो. आर्थिक सामाजिक परिस्थितीचा सर्वाधिक परिणाम मुलींच्या शिक्षणावर होतो. पारंपरिक कौटुंबिक उत्पादनात व घरकामात मदत, लहान भावंडांना सांभाळणे, शाळेचे अंतर जास्त असणे, अध्यापनाची भाषा अशा अनेक कारणांनी मुली प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकत नाही. व्ही. सी. पांडे यांनी त्याच्या ऋळीश्री झीळारी एर्वीलरींळेप या पुस्तकात विकसनशील देशातील मुलींच्या प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण मांडले आहे. ३८ विकसनशील देशात भारत आठव्या क्रमांकावर आहे. ६ ते १४ वर्षांतील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण चढत्या वर्गाप्रमाणे कमी-कमी होत जाते. आर. के. राव यांनी थोशप रपव एर्वीलरींळेप या पुस्तकात जातीचा प्रभाव मुलींच्या शिक्षणावर कसा होतो हे मांडले आहे. त्यांच्या मते तळाशी असलेल्या जातीतील मुलींचे गळतीचे प्रमाण इतर मुलींच्या तुलनेत जास्त आहे.

स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण प्रवास जातवर्गीय लिंगभावी राहिल्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होऊ शकलेले नाही. सार्वत्रिकीकरण विरोधी धोरणाचा सर्वाधिक परिणाम मुलींच्या शिक्षणावर होतो. चढता वर्ग व वाढत्या वयाप्रमाणे मुलींचे प्रवेश प्रमाण कमी-कमी होत असल्याचे युडायस २४-२५ च्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील मुलींची प्रवेश टक्केवारी ६ ते १३ वयातील (१ली ते ८वी) १०० टक्के, १४ ते १५ (९वी ते १०वी) ८६.५ टक्के आणि १६ ते १७ (११वी ते १२वी) ५० टक्के प्रमाण होते. ही आकडेवारी सरकारी आहे. यात शाळाबाह्य मुलींचा सहभाग नाही. इतर सर्वेक्षण व अभ्यासातून उच्च प्राथमिक शिक्षणापर्यंत ५० टक्केच्या आसपास मुली शिक्षण प्रवाहाच्या बाहेर होतात. ही स्थिती मुलींना परंपरेच्या चौकटीत ढकलण्यास पूरक ठरते. सत्ताधारी वर्गाच्या धोरणाचा भाग म्हणून मोठ्या प्रमाणात मुलींची गळती व शाळाबाह्यतेचा प्रश्न उभा झाला आहे. दुसरे कारण सामाजिक आणि सांस्कृतिक आहे. भारताची कुटुंब रचना स्त्रियांना जखडून ठेवणारी आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत ती सतत कामात राहण्याची रचना अस्तित्वात आली आहे. स्वत:च्या मूलभूत व नैसर्गिक गरजा बाजूला ठेवून घरकाम व आर्थिक उत्पादनात तिला झोकून द्यावे लागते. (आदिवासी) दुर्गम भाग, (शेतमजूर वा अन्य श्रमाची कामे) ग्रामीण स्त्री, (कौटुंबिक पारंपरिक उत्पादन) ग्रामीण निम्न उत्पन्न गटातील स्त्री, (बांधकाम मजूर वा अन्य श्रमाची कामे) शहरी झोपडपट्टीतील स्त्री, (स्वच्छता व सेवा) दलित स्त्री, (वेतनावलंबी) मध्यमवर्गीय स्त्री, (व्यवसाय वा उच्च पदस्थ) उच्च मध्यमवर्गीय स्त्री, (व्यवस्थापन) उच्चवर्गीय स्त्री या विविध स्तरातील स्त्रियांचे उत्पन्नाचे साधन, सुविधा व साधनाची उपलब्धता भिन्न आहे, परंतु घरकाम, गरोदर व संगोपन आणि सेवेची जबाबदारी समान आहे. सर्वात निम्न स्तरांतील स्त्रियांचे श्रम व वेळ सर्वाधिक व प्रतिष्ठा न्यूनतम अशी व्यवस्था अस्तित्वात आली आहे. लैंगिक संबंधात पती स्वामित्व गाजवतो, पत्नीची इच्छा-अनिच्छा ग्राह्य धरल्या जात नाहीत. समाजात पुरुषांच्या भोगवादी नजरेचा सामना स्त्रियांना सातत्याने करावा लागतो. तिला तिचा पती निवडायचा व सोडायचा अधिकार समाजाने मान्य केलेला नाही. सीतेच्या स्वयंवरानंतर पती निवडायचा व सोडायचा अधिकार पुरुषकेंद्रित झाला आहे.

# एकीचे बळ

महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय क्षेत्रात बरेच काही बरे-वाईट घडत आहे. इतके दिवस जे काही घडले-बिघडले ते सुधारण्याचे प्रयत्न होत आहेत. सर्वच राजकीय पक्षांना एकीच्या बळाची जाणीव होत आहे. आपसातील मतभेद विसरून पुन्हा एकवटण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. ज्यांच्यात आडवा विस्तू जात नव्हता ते एकत्र फुलण्याचे स्वप्न पाहत आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे आणि मनसेचे मनोमिलन झाले आहे, फक्त त्याची घोषणा बाकी आहे. एकदा का मिलन झाले की त्याचा निकाल येण्यास तसा उशीर होणारच. मराठीच्या मुद्यावरून २० वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर एकत्र आल्यानंतर गत काही महिन्यांपासून उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या गाठीभेटी वाढल्या होत्या, कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये उपस्थिती वाढली होती. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू लवकरच राजकीयदृष्ट्या एकत्र येणार असल्याचे संकेत मिळाले होते. आता शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनीच युती संदर्भात सूतोवाच केले आहे.

त्यांनी आपल्या पोस्टमध्ये राज व उद्धव ठाकरेंचा पुष्पगुच्छ देतानाचा फोटो शेअर केला आहे आणि त्याच्या खाली 'उद्या १२ वाजता' असे कॅप्शन दिले आहे. मनसे आणि ठाकरेंची शिवसेना यांच्यात जागावाटप पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले तरी काही जागांवरून तिढा कायम होता. याच मुद्यावरून राज ठाकरे यांनी मंगळवारी दोन्ही पक्षांच्या नेत्यांना जागा वाटपाची प्रक्रिया अनावश्यक ताणून धरू नका, लांबवू नका असे सांगितले होते. 'मातोश्री'वर मंगळवारी मनसे आणि ठाकरे गटाच्या नेत्यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक पार पडली होती. त्यावेळी शिवडी आणि दादरमधील जागावाटपाचा तिढा पार पडला होता. परंतु भांडुप, विक्रोळी आणि पश्चिम उपनगरातील काही जागांवरून दोन्ही गटांत रस्सीखेच सुरू होती. मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी मंगळवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाल्याने ठाकरे गट व मनसेतील इच्छुक उमेदवारांचे पक्षाकडून मिळणा-या 'एबी' फॉर्मकडे लक्ष लागले आहे. त्यामुळे लवकरात लवकर युतीच्या घोषणेची प्रतीक्षा होती. 'एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी' ही ५ जुलैच्या मोर्चाच्या वेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेली घोषणा अखेर प्रत्यक्षात येत आहे. हिंदी सक्तीच्या विरोधात झालेल्या आंदोलनातील यशाबद्दल विजयोत्सवाच्या निमित्ताने वरळीच्या डोममध्ये दोन भाऊ एकत्र आले. त्याच दिवशी युतीची निश्चिती झाली होती.

दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी युती स्वीकारली असून कोणाच्याही मनात संभ्रम नाही. शिवसेना आणि मनसेची युती कार्यकर्त्यांनीच स्वीकारली आहे. कोणाच्याही मनात संभ्रम नाही. तशा सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. एकत्र येऊन सर्व कामाला लागले आहेत. मनोमिलन झाले असून जागावाटपावर शेवटचा हात फिरवला गेला आहे. युती झालेली आहे, केवळ जागावाटपासंदर्भात घोषणा बाकी आहे. आमच्यात जागावाटपावरून कोणताही विसंवाद नाही. वरळीमधील डोममध्ये जेव्हा दोन भाऊ एकत्र आले तेव्हाच युती झाली असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. मुंबई महापालिकेसाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत युती करण्यासाठी आमदार जयंत पाटील यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. काँग्रेस स्वबळावर लढणार असल्यामुळे त्यांचा विषय आम्ही बंद केला आहे. आम्हाला त्यांची काही ठिकाणी मदत लागली तर त्यांच्याशी नक्कीच चर्चा करू, असेही संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

निकालानंतर परिस्थिती निर्माण झाली आणि काँग्रेसची मदत लागली, तर ती घेतली जाईल असे राऊत यांनी स्पष्ट केले. महाविकास आघाडी तुटलेली नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि डावे पक्ष अजूनही एकत्र आहेत असेही ते म्हणाले. एकीकडे ठाकरे बंधू एकत्र आले असताना पुण्यातही पवार कुटुंब एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहे. पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असून २६ डिसेंबर रोजी यासंबंधीची घोषणा केली जाईल अशी माहिती अजित पवार यांनी दिली. शरद पवारांविरोधात बंड पुकारून पक्ष फोडणारे अजित पवार आता पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये शरद पवारांसह आघाडीत जाण्याची शक्यता आहे. तसे संकेत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शशिकांत शिंदे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे सुभाष जगताप यांनी दिले. या घडामोडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. मात्र, माझ्यापर्यंत कोणताही राजीनामा आला नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

आपल्याकडे कोणताही औपचारिक प्रस्ताव आलेला नाही असे सांगून सुप्रिया सुळे म्हणाल्या, आघाड्या कुणी कशा करायच्या याबाबत अनेक पातळ्यांवर अनेक नेत्यांची चर्चा सुरू आहे. ठोस काही हाती येत नाही, तोपर्यंत आपण काय बोलणार? आमचा पक्ष लोकशाही पद्धतीने चालतो. त्यामुळे पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी चर्चा होईल. माझी प्रशांत जगताप यांच्याशी दोन तास चर्चा झाली. काय पर्याय असू शकतात याबाबत त्यांच्याकडून जाणून घेतले. मात्र माझ्याकडे कुठल्याही पक्षाचा प्रस्ताव औपचारिक पद्धतीने आलेला नाही. मुंबईत उद्धव ठाकरेंच्या पक्षाशी आमची चर्चा सुरू आहे असे सुप्रिया म्हणाल्या. महायुती सरकारचा भाग असूनही अजित पवार हे पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये शरद पवारांच्या पक्षाशी आघाडी करणार असल्याने त्यातून जनतेत वेगळा संदेश जाऊ शकतो. मात्र अमित शहा यांना पूर्वकल्पना देऊनच शरद पवारांशी आघाडीबाबत निर्णय घेण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे.

अखेर होणार होणार अशी जी चर्चा सुरू होती ती झालीच. ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसे या पक्षांची युती झाली. महाराष्ट्राच्या राजकारणात गत दोन दशकांपासून ज्या क्षणाची प्रतीक्षा मराठी माणूस आणि शिवसैनिक करत होता, तो क्षण अखेर उजाडला. महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि मराठी माणसाचा अधिकार वाचवण्यासाठी आम्ही सर्व मतभेद विसरून एकत्र आलो आहोत असे राज आणि उद्धव यांनी ठामपणे सांगितले. दिल्लीतील सत्ताधीशांच्या डोळ्यात मुंबई खुपत आहे. आम्ही कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोत, हे नाते आता तुटणार नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे स्वप्न पाहणा-यांचा राजकारणातून खात्मा केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही असे ते म्हणाले. राज ठाकरे म्हणाले, कोणत्याही वादापेक्षा किंवा भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. तीच या युतीची ठिणगी होती. सध्या राज्यात राजकीय पक्ष पळवणा-या टोळ्या फिरत आहेत. महाराष्ट्राला स्थिरतेची गरज आहे. ही युती केवळ निवडणुकीपुरती नसून महाराष्ट्राच्या हितासाठी आहे असे राज ठाकरे म्हणाले. राज आणि उद्धव यांच्या एकीचे बळ राज्यात काय रंग भरते ते बघायचे.

# 'इंडिगो'ची सद्दी संपणार?

भारतीय नागरी विमान वाहतूक क्षेत्रात लवकरच मोठी स्पर्धा पहावयास मिळणार आहे. केंद्र सरकारने तीन नवीन एअरलाईन्सना देशांतर्गत विमान सेवा सुरू करण्यास परवानगी दिली असून यामुळे प्रवाशांना प्रवासाचे नवीन आणि स्वस्त पर्याय उपलब्ध होणार आहेत. नागरी उड्डाण मंत्रालयाने 'अल हिंद एअर', 'फ्लाय एक्स्प्रेस' आणि 'शंख एअर' या कंपन्यांना 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) जारी केले आहे. उत्तर प्रदेशातील 'शंख एअर' २०२६ मध्ये आपले कमर्शियल ऑपरेशन्स सुरू करू शकते. त्यांच्याकडे या पूर्वीच एनओसी उपलब्ध आहे. केरळच्या 'अल हिंद ग्रुप'कडून 'अल हिंद एअर'चे प्रवर्तन केले जात आहे तर 'फ्लाय एक्स्प्रेस'च्या प्रवर्तनाबाबत अजून माहिती मिळालेली नाही. देशातील विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने दोन नवीन एअरलाईन्सना परवानगी देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सरकारच्या 'उडान' योजनेअंतर्गत स्टार एअर आणि फ्लाय-९१ यासारख्या लहान एअरलाईन्स आधीच कार्यरत आहेत. आता अल हिंद एअर, फ्लाय एक्स्प्रेस, शंख एअरमुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांची हवाई जोडणी अधिक मजबूत होऊ शकेल.

यामुळे प्रवाशांना अधिक पर्याय, स्पर्धात्मक भाडे आणि चांगली सेवा मिळेल, असा अंदाज आहे. सध्या देशांतर्गत विमान प्रवास करणा-या सुमारे ९० टक्के प्रवाशांकडून इंडिगो आणि टाटा समुहाच्या एअर इंडिया सेवांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत एखाद्या मोठ्या एअरलाईनमध्ये अडचण निर्माण झाल्यास संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. ही जोखीम कमी करण्यासाठी सरकारने नव्या एअरलाईन्सना परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी नेमके तसे घडले. देशातील सर्वात मोठी एअरलाईन इंडिगोच्या प्रणालीत बिघाड झाला आणि मोठा गोंधळ उडाला. इंडिगोने ऐनवेळी अनेक उड्डाणे रद्द केली आणि हजारो प्रवाशांना त्याचा फटका बसला. प्रवाशांना तासन्तास विमानतळावर बसावे लागले. अनेक जण आपल्या निर्धारित स्थळी पोहोचू शकले नाहीत. उड्डाणे रद्द झाल्याने तिकिटाचे पैसे परत मिळवण्यासाठी वाद झाले. या घटनेमुळे भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व किती धोकादायक ठरू शकते ते स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर सरकारने घेतलेला निर्णय योग्यच म्हणावा लागेल. सरकारने तीन नवीन विमान कंपन्यांना एनओसी दिली म्हणजे लगेच उद्यापासून या कंपन्यांच्या विमानातून प्रवास करता येईल, असे नाही.

सरकारने या कंपन्यांना विमानसेवा सुरू करण्याची प्रक्रिया पुढे नेण्याची परवानगी दिली आहे. सरकारकडून एनओसी मिळाल्यानंतर या विमान कंपन्यांना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) एअर ऑपरेटर प्रमाणपत्र (एओसी) घ्यावे लागेल. नंतर फ्लीट, क्रू, नेटवर्क आणि देखभालीबाबत तयारी करावी लागेल. या प्रक्रियेला अनेक महिने लागू शकतात. या प्रक्रियेत एअरलाईनची आर्थिक रणनिती आणि ऑपरेशनल क्षमता समाविष्ट केल्या जातात. भारतातील विमान वाहतूक बाजारपेठ वेगाने वाढत आहे. नव्या विमान कंपन्यांच्या समावेशामुळे अधिक सुविधा आणि चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. नवीन कंपन्यांच्या आगमनामुळे स्पर्धा वाढेल. विमानांची निवड करताना प्रवाशांकडे विविध पर्याय उपलब्ध असतील. नवीन विमान कंपन्यांना परवानगी देण्यामागे सरकारचे उद्दिष्ट इंडिगो आणि एअर इंडियावरील अवलंबित्व कमी करणे हे आहे. उत्तर प्रदेशस्थित शंख एअरलाईन्स २०२६ च्या पहिल्या तिमाहीत सुरू होण्याची अपेक्षा आहे. पुढील ३ वर्षात या एअरलाईन्सच्या ताफ्यात २० ते २५ विमाने राहतील, अशी अपेक्षा आहे. देशातील प्रमुख शहरे आणि राज्यांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्याचे शंख एअरचे उद्दिष्ट आहे. अल हिंद ही केरळस्थित अल हिंद ग्रुपच्या मालकीची आहे.

या एअरलाईनचे ध्येय प्रादेशिक आणि कमी किमतीची कनेक्टिव्हिटी प्रदान करणे आहे त्यामुळे सामान्य व्यक्तीसाठी विमान प्रवास परवडणारा बनू शकतो. देशात फ्लाय एक्स्प्रेस सुरू झाल्यानंतर कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंत सर्व काही व्यावसायिक उद्देशाने वाहतूक करणे सोपे होईल. देशांतर्गत हवाई कार्गोच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ही विमान कंपनी प्रवासी उड्डाणांसाठी एक व्यवहार्य पर्याय म्हणून काम करू शकते. सध्या भारतीय विमान वाहतूक बाजारपेठेच्या सुमारे ९० टक्के हिश्श्यावर इंडिगो आणि एअर इंडिया समुहाचे वर्चस्व आहे.

एकट्या इंडिगोचा बाजारपेठेतील हिस्सा ६५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या दोन बड्या कंपन्यांच्या मक्तेदारीमुळे प्रवाशांना अनेक वेळा मर्यादित पर्यायांचा सामना करावा लागतो. गत काही वर्षात 'गो फर्स्ट' आणि 'जेट एअरवेज'सारख्या कंपन्या आर्थिक संकटामुळे बंद पडल्याने या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली होती मात्र आता नवीन कंपन्या आल्याने विमान वाहतूक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी देशात विमान ऑपरेटरची संख्या वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू म्हणाले,

भारतीय आकाशात जास्तीत जास्त कंपन्यांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय आहे त्यामुळे प्रवाशांना उत्तम सेवा आणि वाजवी दरात तिकिटे मिळतील. सरकारचा हा निर्णय कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी क्रांतिकारी ठरू शकतो. प्रवाशांचा फायदा होणार आहे तसेच स्पर्धा वाढल्यामुळे विमान प्रवासाचे दर नियंत्रणात राहतील. कनेक्टिव्हिटी सुधारेल आणि देशातील दुर्गम भागातील शहरांना विमान सेवेने जोडणे सोपे होईल. परवाना मिळालेल्या कंपन्यांना आता विमानांची खरेदी, पायलट-कर्मचा-यांची भरती आणि मोठे नेटवर्क उभारण्यासाठी प्रचंड भांडवलाची गरज भासणार आहे. या कंपन्यांना पुढील काही महिने तांत्रिक आणि आर्थिक बाबींची पूर्तता करावी लागेल. यात विमान देखभाल, वैमानिकांचे प्रशिक्षण आणि रूट मॅपिंगचा समावेश असेल. या प्रक्रियेनंतरच या कंपन्यांची विमाने प्रत्यक्ष आकाशात झेप घेतील. सरकारच्या निर्णयामुळे केवळ मोठ्या शहरांनाच नव्हे तर ग्रामीण भागालाही हवाई नकाशावर स्थान मिळेल. भारताचे विमान वाहतूक क्षेत्र जगातील अन्य कोणत्याही देशापेक्षा अधिक वेगाने विस्तार पावत आहे त्यामुळे अधिक कंपन्या सामावून घेण्याची या क्षेत्राची क्षमता आहे.

Samvidhan Kalm is a weekly printed by Mrs. Priyanka Shashikant Kamble, owner, publisher, editor at Shri Samarth Printers, 686, Sivganga Chambers, Shop No. G1, Budhwarpeth, Pune, Tal. Haveli, Dist. Pune 411002 (Maharashtra) and published at Popular Colony, C 1/13, Vitthalnagar Neighborhood, Warjemalwadi Pune - 412258. Contact - 9970619999 Email : sanvidhankalam14@gmail.com

संविधान कलम हे सप्ताहिक मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक सौ. प्रियांका शशिकांत कांबळे यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी१, बुधवारपेठ, पुणे, ता. हवेली, जि. पुणे ४११००२ (महाराष्ट्र) येथे छापून, पॉप्युलर कॉलनी, सी १/१३, विठ्ठलनगर शेजारी, वारजेमाळवाडी पुणे - ४१२२५८ येथे प्रसिद्ध केले. संपर्क - ९९७०६१९९९९ Email : sanvidhankalam14@gmail.com

टीप : या सप्तहिकात प्रसिद्ध झालेल्या जाहिराती/मताशी संपादक सहमत असतील. लेखात/कथेत व्यक्त केलेल्या मजकुराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित लेखकाची जबाबदार (पी. आर. पी. कायद्यानुसार संपादकांची राहील) या अंकात प्रसिद्ध झालेल्या कथांचे सुरक्षित प्रकाशकांच्या लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुर्नप्रकाशनास मनाई आहे. कार्यकारी संपादक : शशिकांत कांबळे



## ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा’ने देशातील वीस मुलांचा सन्मान

नवी दिल्ली. दि. २६ : वीर बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज देशातील २० मुलांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने(२०२५) सन्मानित करण्यात आले.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरीसाठी छत्रपती संभाजी नगर येथील अर्णव महर्षीला गौरविण्यात आले. महिला व बालविकास मंत्रालयातर्फे राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सात क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी देशभरातील २० बालकांना २०२५ या वर्षासाठीचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केले.

शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल या बालकांना गौरविण्यात आले. यापैकी दोघांना मरणोत्तर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारार्थींमध्ये मध्ये ९ मुले आणि ११ मुलींचा समावेश आहे. यावेळी केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सावित्री ठाकूर आणि मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक उपस्थित होते.

**महाराष्ट्राच्या अर्णव महर्षीचा गौरव**

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील १७ वर्षीय अर्णव महर्षी यास विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. लकवाग्रस्त रुग्णांच्या हातांसाठी -ख-आधारित पुनर्वास उपकरण आणि ॲक्टिव्ह हँड रिस्ट बँड तयार करणाऱ्या अर्णव महर्षी याने स्मार्टफोन किंवा लॅपटॉपच्या मदतीने हे नवोन्मेषी उपकरण विकसित केले आहे.

# ९ जानेवारीपासून भीमाशंकर मंदिर ३ महिन्यांसाठी बंद

**पुणे :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असेलेले भीमाशंकर मंदिर काही दिवसांसाठी बंद राहणार आहे. भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील ३ महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्यात येणार आहे.



श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थानने हा निर्णय घेतला आहे. याकरिता भाविकांना सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे. मात्र भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदीर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांकडून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे.

नित्य पूजा सुरू राहणार: मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील.

# थंडीचा पारा चढला !

■ **राज्यातील लाट ओसरली**

**पुणे** - राज्यातील किमान तापमानात एक ते दोन अंशाने वाढ झाल्यामुळे मध्य महाराष्ट्रासह विदर्भातील थंडीची लाट ओसरत आहे. तर अहिल्यानगर, पुणे, नाशिक, मालेगाव आणि विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात किमान तापमान ९ अंशापर्यंत खाली नोंदविल्यामुळे गारठा चांगलाच जाणवत आहे. तर अन्य जिल्ह्यातील थंडीचा पारा १० ते ११ अंशाच्या पुढे गेला आहे.राज्यातील मध्य महाराष्ट्रासह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात किमान तापमान ६ अंशाच्या



खाली नोंदविल्यामुळे थंडीची लाट आली आणि हुडहुडीने महाराष्ट्र गारठला होता.

मात्र, मागील दोन ते तीन दिवसांपासून किमान तापमान दोन ते तीन अंशाने वाढ झाल्यामुळे पारा ९ अंशावर आला, तर काही जिल्ह्यांतील पारा ११ ते १२ अंशाच्या पुढे गेल्यामुळे थंडीचा जोर ओसरू लागला आहे. मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, नाशिक, मालेगाव, तर विदर्भातील गोंदिया आणि यवतमाळ जिल्ह्यातील किमान तापमान ९ अंशापर्यंत नोंदविले.

परिणामी या जिल्ह्यात हुडहुडी कायम असून, अन्य जिल्ह्यात मात्र हुडहुडी कमी झाल्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस राज्यातील किमान तापमानात फारसा बदल होणार नसून, थंडीचा जोर कायम राहील, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून वर्तविण्यात आला.



## अवैध दारूवर कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांना बंद कपाटात सापडलं मोठं घबाड

**पुणे** - कोंढवा परिसरात अवैध दारूविक्रीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या पथकाला धक्कादायक बाब समोर आली आहे. कारवाईदरम्यान एका ठिकाणी बंद कपाटाची तपासणी केली असता त्यामध्ये तब्बल कोट्यवधी रुपयांची रोख रक्कम आढळून आली. अचानक सापडलेल्या या मोठ्या रकमेने पोलिसांसह परिसरातही खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीनुसार संबंधित ठिकाणी अवैध दारू साठा आणि विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर कोंढवा पोलिसांनी छापा टाकला. छाप्यादरम्यान दारूसाठ्यासोबतच एका बंद कपाटात मोठ्या प्रमाणात रोख रक्कम ठेवलेली आढळून आली. सदर रक्कम नेमकी कोणाची आहे आणि तिचा अवैध व्यवसायाशी काय संबंध आहे, याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी संबंधित व्यक्तींना ताब्यात घेतले असून, रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. आर्थिक व्यवहार, दारू माफिया नेटवर्क आणि इतर गुन्हेगारी संबंधांचा तपास सुरू असून, आवश्यक त्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास कोंढवा पोलीस करत आहेत.

## हॉटेल्स व आस्थापनांमध्ये सखोल तपासणीचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचे निर्देश

■ **नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन सतर्क**

**मुंबई :** नववर्षाचे आगमन, उत्सव आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्य आस्थापनांमध्ये तयार होणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ असणे आवश्यक आहे. यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेलमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व असून यासंदर्भात हॉटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे. तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाईल. यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर मोठी मोहीम हाती घेतली असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले.

उत्तम स्वच्छता व अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणाऱ्या हॉटेल आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार देण्यात येणार आहेत. जिल्हास्तरावरील पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील, तर राज्य स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या हॉटेल्सचा सन्मान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

# इच्छुकांचा महापूर !

■ **महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच इतकी मोठी झुंबड; पालिकेची दमछाक**

**पुणे :** काहीही झाले तरी महापालिका निवडणूक लढवायचीच, असा चंग बांधलेल्या इच्छुकांनी गेल्या तीन दिवसांत तब्बल ९ हजार १०१ उमेदवारी अर्ज खरेदी केले आहे. त्यामुळे आतापर्यंत प्रत्येक जागेसाठी सरासरी ५५ अर्जांची विक्री झाली आहे. पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढया मोठया प्रमाणात अर्ज विक्री झाली असून अर्ज देताना पालिकेची चांगलीच दमछाक होत आहे. महापालिका निवडणुका चार सदस्यांच्या प्रभागात होणार असून ४१ प्रभागांतून १६५ सदस्यांच्या निवडणुकीसाठी १५ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये स्थापन केली आहेत. येथे अर्ज विक्री आणि स्वीकृती होत आहे.पालिकेच्या माहितीनुसार २३ व २४ डिसेंबर २०२५ रोजी एकूण ६४३७ अर्जांची विक्री जाली. शुक्रवारी ( २६ डिसेंबर) आणखी २६६४ अर्जांची विक्री झाली असून, आतापर्यंत एकूण ९१०१ अर्जांची विक्री झाली आहे. सर्वाधिक अर्जांची विक्री कोथरूड-बावधन तर सर्वात कमी विक्री कसबा विश्रामबागवाडा कार्यालयात झाली. निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची ३० डिसेंबर ही अंतिम मुदत असून शुक्रवार अखेर ८ अर्ज भरले आहेत. बिबवेवाडी कार्यालयात ३, वारजे कर्वेनगरला २, कै. बा. स. ढोले पाटील रोड, नगर रोड-वडगाव शेरीला, कोथरूड-बावधनला प्रत्येकी अर्जाचा समावेश आहे.

## भाजपचे माजी नगरसेवक उदय जोशी यांचे ससूनमध्ये निधन

**पुणे :** ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी येरवडा कारागृहात असलेले भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक उदय जोशी (वय ६३) यांचे शुक्रवारी सकाळी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. जोशी हे वर्षभरापासून कारागृहात न्यायालयीन कोठडीत होते. आजारपणामुळे त्यांनी जामीन मिळवण्यासाठी त्यांनी न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, सुनावणीपूर्वीच त्यांचे निधन झाले.

ठेवीदारांची पाच कोटी ७३ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी भाजपचे माजी नगरसेवक, सदाशिव पेठेतील निनाद नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक उदय जोशी, त्यांचा मुलगा मयुरेश यांच्यासह सात जणांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जोशी यांच्या मुलाने सिंहगड रस्ता परिसरात गॅस वितरण एजन्सीत गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून पैसे घेतले होते.

पैसे घेतल्यानंतर परतावा न दिल्याप्रकरणी विश्रामबाग ठाण्यात उदय जोशी, त्यांचा मुलगा यांच्यासह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात त्यांच्याविरुद्ध चार गुन्हे दाखल झाले होते.

## मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी कृतीतून संकल्प करूया

■ **वीर बाल दिवसानिमित्त साहिबजाद्यांच्या शौर्याला नमन**

**मुंबई :** शीख पंथीयांचे दहावे गुरू श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाच्या स्मरणार्थ २६ डिसेंबर हा दिवस ‘वीर बाल दिवस’ म्हणून पाळला जातो. वीर बाल दिवसाच्या निमित्ताने गुरूंनी दाखविलेल्या मानवतेच्या मार्गावर चालण्यासाठी आणि त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात अंगीकारण्यासाठी आपण स्वतःला कृतीतून संकल्पित केले पाहिजे. साहिबजाद्यांच्या धैर्याने आणि बलिदानाने भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली असून, त्यांचे शौर्य सदैव पिढ्यान्पिढ्यांना प्रेरणा देत राहील,



असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सायन येथील गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबार येथे वीर बाल दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीर शहीद साहिबजादे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण केले. यावेळी गुरूद्वारा समितीच्या सदस्यांनी किर्तन, कविता वाचन केले आणि वीर शहीद साहिबजादे यांना आदरांजली अर्पण केली.

यावेळी आमदार प्रसाद लाड, आमदार तमिल सेल्वन, श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम समितीचे राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक, पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष बल मलकित सिंह, गुरुद्वारा समितीचे सदस्य दलजीत सिंग, गुरुदेव सिंग, जसपाल सिंग सिद्धू, हॅपी सिंग, डॉ. अजयसिग राठोड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बल मलकीत सिंग यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले. शासनाच्या पुढाकाराने गुरूंच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा मिळत असल्याचे नमूद करुन या उपक्रमासाठी बल मलकित सिंग यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले.



# आरटीआय आदेशांवर पुणे विद्यापीठाची पळवाट?

■ **शासनाच्या पारदर्शकतेच्या निर्णयाला हरताळ**

**पुणे** - माहिती अधिकार कायद्यांतर्गत दर सोमवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरिकांना कागदपत्रे पाहण्यासाठी खुली ठेवण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. मात्र,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने याबाबत संदिग्ध भूमिका घेतली आहे. याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने स्वतंत्र आदेश दिले नसल्याची तांत्रिक पळवाट काढत विद्यापीठाने शासनाच्या आदेशालाच हरताळ फासल्याचा आरोप सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केला आहे.

वेलणकर यांनी १५ डिसेंबर रोजी कुलगुरूंना पत्र लिहून प्रशासनाच्या २६ नोव्हेंबर २०१८ च्या परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. पुणे महापालिकेच्या धर्तीवर विद्यापीठातही दर सोमवारी दोन तास कागदपत्रे पाहण्याची सुविधा मिळावी, हा त्यामागचा उद्देश होता. त्यावर विद्यापीठाने म्हटले आहे की, सामान्य प्रशासन विभागाचे आदेश आम्हाला लागू होत नसून, जोपर्यंत उच्च व तंत्रशिक्षण स्वतंत्र आदेश काढत नाही, तोपर्यंत अंमलबजावणी होणार नाही.

विशेष म्हणजे, एका बाजूला आदेश नसल्याचे सांगतानाच, दुसऱ्या बाजूला २०१२ च्या जुन्या परिपत्रकाचा आधार घेत आठवड्याचे पाचही दिवस सोयीनुसार माहिती उपलब्ध करून देतो, असेही म्हटले आहे. दरम्यान,आठवड्याचे पाचही दिवस नागरिक माहितीसाठी आले, तर विद्यापीठाच्या दैनंदिन कामकाजात व्यत्यय येईल. हाच व्यत्यय टाळण्यासाठी शासनाने आठवड्यातील एक दिवस निश्चित केल्याचे भान विद्यापीठाला का नाही? असा सवाल वेलणकर यांनी उपस्थित केला आहे.

विहित प्रक्रिया आणि सोयीनुसार या शब्दांच्या आड प्रशासन जाणीवपूर्वक पारदर्शकता टाळत असल्याचे दिसते. यावर विद्यापीठाने तातडीने खुलासा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

# भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिनाची तयारी पूर्ण

■ **२० लाख अनुयायी येण्याचा अंदाज**

**पुणे** - दि. १ जानेवारी २०२६ रोजी मौजे पेरणे येथे होणारा २०९ वा भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या वर्षी सुमारे २० लाख अनुयायी येण्याची शक्यता गृहीत धरून जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. या सोहळ्याला जास्तीत जास्त आंबेडकरी अनुयायांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भीमा कोरेगाव विजयस्तंभ समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केले आहे.

सुरक्षेसाठी 'फेस स्कॅनिंग'चा वापर यंदा सुरक्षेवर विशेष भर देण्यात आला असून, समाजकंटक आणि चोरट्यांवर नजर ठेवण्यासाठी पुणे पोलीस पहिल्यांदाच ड्रोनद्वारे फेस स्कॅनिंग यंत्रणेचा वापर करणार आहेत. सुरक्षिततेसाठी पुणे शहर आणि ग्रामीण पोलिसांचा १३ हजारांहून अधिक जणांचा ताफा तैनात असेल. पिण्याचे पाणी, पार्किंग आणि शौचालयांची संख्या वाढवून नियोजन अधिक दर्जेदार करण्यात आले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयस्तंभाला दिलेल्या भेटीला १०० वर्षे पूर्ण होत असल्याने हे वर्ष 'मानवंदना शताब्दी वर्ष' म्हणून साजरे केले जाणार आहे. त्यानिमित्त विशेष अभिवादन कार्यक्रम होणार आहे. तसेच, महार रेजिमेंटच्या सुमारे ३,००० निवृत्त सैनिकांकडून लष्करी शिस्तीत राष्ट्रगीतासह मानवंदना दिली जाईल. यावेळी मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे डंबाळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



# निवडणूक कर्तव्यात कसूर, कनिष्ठ अभियंत्याचं थेट निलंबन

**पुणे** - पुणे महापालिका निवडणूक विषयककामासाठी हजर न झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यावर थेट निलंबनाची कारवाई करण्यात आली. कोंढवा- येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील निवडणूकविषयक कर्तव्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता अस्मिता गाडीवडर यांची नियुक्ती केलेली असताना त्या कर्तव्यावर हजर झालेल्या नाहीत.

त्यामुळे तात्काळ प्रभावाने सेवेतून निलंबित करण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी मनोहर गव्हाड यांनी जारी केले आहेत. निवडणूक कामकाज हे राष्ट्रीय कर्तव्य असून, यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम १४ मधील तरतूद, राज्य निवडणूक आयोगाचे वेळोवेळीचे आदेश विचारात घेऊन विविध कार्यालयाकडील कर्मचाऱ्यांच्या सेवा सदर निवडणूकविषयक कामासाठी उपलब्ध करून घेण्यात आलेल्या आहेत.

याअंतर्गत कर्मचाऱ्यांना विविध क्षेत्रीय कार्यालयांकडे निवडणूकविषयक कर्तव्यासाठीचे आदेश बजावण्यात आलेले आहेत. मात्र, काही कर्मचारी हे त्यांना नेमून दिलेल्या कार्यालयांकडे हजर न झाल्याने निवडणूकविषयक कामामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत.गाडीवडर यांची नेमणूक भरारी पथकामध्ये करण्यात आली होती.

दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी नेमून दिलेया क्षेत्रात कार्यवाहीसाठी जाणे गरजेचे असताना गाडीवडर या कार्यवाहीसाठी अनुपस्थित राहिल्या. त्यामुळे इतर पथकाची तात्पुरती नेमणूक करून त्यांना कार्यवाहीसाठी पाठवावे लागले. त्यांच्या अनुपस्थितीमुळे निवडणुकीचे काम पार पाडण्यात अडथळा निर्माण झालेला आहे. यास्तव निवडणूक निर्णय अधिकारी गव्हाड यांनी गाडीवडर यांच्या निलंबनाचे आदेश जारी केले आहेत.

## उत्पादकता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविणार

**नागपूर :** शेतीची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन नैसर्गिक शेती राबविण्याचे राज्य सरकारने ठरविले असून, येत्या २ वर्षात २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेती लागवडीखाली येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एल.आय.टी.) माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित उडान संमेलनात ते बोलत होते. सत्यनारायण नूवाल आणि पद्मश्री डॉ. डी. के. यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. आर. एल. सोनोलिकर, अरुण दांडेकर यांना जीवन गौरव प्रदान करण्यात आला. तसेच लाइफ टाइम अचिव्हमेंट दीपक लव्हाळा यांना, ज्वेल ऑफ एलआयटी डॉ. सुगंधा गारवे, कीर्ती गणोरकर, आर.जी. कृष्णन, अमित सिन्हा, नीरा चंदना यांना, तर युथ आयकॉन पुरस्कार चिंतन शाह यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

आज सर्वच क्षेत्रात एआयचा वापर होतो आहे. ती काळाची गरज आहे, त्यामुळे एल आय टी सारख्या संस्थानी मोठ्या प्रमाणात एआयचा स्वीकार करावा, असे आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले की, हे झाले तर जागतिक स्तरावरील स्पर्धे साठी आपण विद्यार्थी घडवू शकू.

फक्त अभ्यासक्रमांनी शिक्षण संस्था मोठी होत नाही, तर ती मोठी होते ती तिच्या विद्यार्थ्यांमुळे, असे पद्मश्री डॉ. यादव यावेळी म्हणाले.

# म्हाडाच्या ४ हजार घरांचा 'लकी ड्रॉ' अडकला

■ **आचारसंहितेचा फटका की मिळणार परवानगी?**

**पुणे** - म्हाडा पुणे विभागाने ४ हजार १८६ घरांसाठी सोडत घेण्यासाठी परवानगी देण्याची मागणी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. आता यावर निवडणूक आयोग काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे. पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या माध्यमातून दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर केलेल्या २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील सोडतीमध्ये संपूर्ण राज्यातून नागरिकांचे एकूण २ लाख १५ हजार ९६५ अर्ज प्राप्त झाले आहे.

त्याची छाननी प्रक्रिया गेल्या काही दिवसांपूर्वी पूर्ण झाली. म्हाडाच्या ४ हजार १८६ सदनिका वाटपाचा ऑनलाइन सोडत (लकी ड्रॉ) कार्यक्रम डिसेंबर महिन्यात घेण्याचा म्हाडाचा प्रयत्न होता. मात्र, लगेचच महापालिका निवडणुकांची आचारसंहिता लागू झाल्याने सोडत घेण्याबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर होऊन सोडतीस परवानगी मिळावी,




अशी मागणी म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदनही वाघमारे यांना देण्यात आले आहे. यावर वाघमारे यांनी तत्काळ राज्याचे मुख्य सचिव यांच्याशी चर्चा करून निर्णय घेणार असल्याचे सांगितले, अशी माहिती आढळराव पाटील यांनी दिली.

# पुरातत्व विभागाने प्राचीन मंदिरांच्या संवर्धनाचे काम वेळेत पूर्ण करावे

**नाशिक :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी देश विदेशातील कोट्यावधी भाविक येतील. कुंभमेळ्यातील अमृत स्नानाबरोबरच ते नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील प्राचीन मंदिरांना भेट देतील. त्यामुळे राज्य पुरातत्व विभागाने त्यांच्याकडील मंदिर संवर्धनाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होईल, अशी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे विविध विषयांवर चर्चेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, नाशिक वनवृत्तचे मुख्य वनसंरक्षक जी. मल्लीकार्जुन, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उपवनसंरक्षक सिध्देश सावर्डेकर, राकेश सेपट, भारतीय पुरातत्व विभागाच्या छत्रपती संभाजी नगर मंडळाचे अधीक्षक शिवकुमार भगत (दूरदृष्यप्रणालीद्वारे) उपस्थित होते.

# मानवी वस्तीत बिबट्या आढळल्यास घाबरुन न जाता वन व वन्यजीव विभागाशी संपर्क साधावा

**सातारा :** मानवी वस्तींमध्ये बिबट्यांचा वावर वाढत आहे. हा वावर कमी करण्यासाठी वन विभागाने व वन्यजीव विभागाने उपाययोजना कराव्यात. मानवी वस्तीत बिबट्या आढळल्यास घाबरुन न जाता नागरिकांनी तात्काळ वन व वन्यजीव विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

पालकमंत्री कार्यालयात मानवी वस्तीत बिबट्याचा वावर यावर करावयाच्या उपायोजनांसदर्भात बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोषी, उपवनसंरक्षक अमोल सातपुते (दूरदृष्य प्रणालीद्वारे) कराडच्या तहसीलदार कल्पना ढवळे आदी उपस्थित होते.

वन विभागाने बिबट्यांपासून संरक्षण कसे करावे याबाबत मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात, असे निर्देश देऊन पालकमंत्री श्री.देसाई म्हणाले, ज्या गावांमध्ये बिबटे आढळले आहेत त्या गावांमध्ये ग्रामसभा घेऊन ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व वन विभाग कर्मचारी यांनी मार्गदर्शक उपाययोजनांची जनजागृती करावी व प्रशासन करीत असलेल्या सूचनांची माहिती द्यावी. चांदोली अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाजवळील गावांमध्ये बिबटे पकडण्यासाठी जास्तीचे पिंजरे लावावेत व त्या ठिकाणी प्राधान्याने ड्रोन कॅमेराचा वापर करावा.

# पुणे-नागपूरसह ३ मार्गांवर विशेष गाड्या

**पुणे** - हिवाळा आणि ख्रिसमस, नव वर्षाच्या स्वागतामुळे रेल्वेला मोठी गर्दी होत असल्याने मध्य रेल्वेने पश्चिम मध्य रेल्वेशी समन्वय साधून नागपूर - हडपसर, पुणे - नागपूर आणि राणी कमलापती - हडपसर दरम्यान विशेष शुल्कासह रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर-हडपसर मार्गावर विशेष रेल्वेच्या चार, राणी कमलापती-हडपसर-राणी कमलापती रेल्वेच्या प्रत्येकी तीन तर पुणे-नागपूर-पुणे साप्ताहिक विशेष रेल्वेच्या प्रत्येकी चार रेल्वे चालविल्या जातील.

गाडी क्रमांक ०१२२१ नागपूर - हडपसर विशेष रेल्वे २६, २९, ३१ डिसेंबर आणि २ जानेवारीस नागपूरहून संध्याकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सव्वा अकराला येथे पोहोचेल. गाडी



क्रमांक ०१२२२ हडपसर- नागपूर रेल्वे २८, ३० डिसेंबर तसेच १ आणि ४ जानेवारी रोजी हडपसरहून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे साडेसहा वाजता नागपूर येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक ०१४१९ पुणे-नागपूर विशेष रेल्वे २७, २९, ३१ डिसेंबर आणि ३ जानेवारी रोजी पुणे येथून रात्री साडेआठ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजून ५ मिनिटांनी नागपूर येथे पोहोचेल.

गाडी क्रमांक ०१४२० नागपूर-पुणे विशेष रेल्वे २८, ३० डिसेंबर तसेच १ आणि ४ जानेवारी रोजी नागपूर येथून दुपारी चार वाजून १० मिनिटांनी सुटेल . दुसऱ्या दिवशी सकाळी पावणेबारा वाजता पुणे येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०२१५६ राणी कमलापती - हडपसर विशेष रेल्वे २७ डिसेंबर तसेच ३ आणि १० जानेवारी रोजी राणी कमलापती येथून सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी सुटेल आणि दुसऱ्या दिवशी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी हडपसरला पोहोचेल. गाडी क्रमांक ०२१५५ हडपसर-राणी कमलापती विशेष रेल्वे २८ डिसेंबर ४ आणि ११ जानेवारीला हडपसर येथून सकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी सुटेल. त्याच दिवशी रात्री ११ वाजून ४० मिनिटांनी राणी कमलापती येथे पोहोचेल.